


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ | पुणें, बुधवार तारीख ३ जुलै १९४६ | अंक २७

## —: साठे बिस्किटें :—


श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेटस

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

★ वृद्धापकाळची तरतूद

★ कुटुंबाचें संरक्षण

★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा पुणें येथील सुप्रसिद्ध

## कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि.

मध्येंच उतरा.

—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

अ

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

## विविध माहिती

**मोटारींच्या विम्याची सक्ती**—१ जुलैपासून मोटारींच्या विम्याची सक्ती अंमलांत आली आहे. मोटर व्हेइकल्स अॅक्टान्वयें व त्या खालील नियमान्वयें विमा न उतरतां मोटार वापरणें गुन्हा आहे.

**चहाच्या नव्या झाडांची आवश्यकता**—१९३० सालानंतर हिंदुस्थानांतील चहाची लागवड वाढलेली नाहीं. १९२९ ते १९३२ ची मंदी व त्यानंतर मागणीपेक्षां उत्पादन वाढूं नये म्हणून इंडियन टी रिस्ट्रिक्शन अॅक्टची अंमलबजावणी, ह्यांमुळें लागवड मर्यादित राहिली. सहाजीकच, आजचीं चहाचीं झाडें २० ते २५ वर्षांपूर्वीं लावलेलीं आहेत. नव्या जागेंत आज झाडें लावलीं तरी तीं उपयोगी येण्यास ५-६ वर्षें लागतील.. तोंवर, आजच्या मळ्यांतील कित्येक झाडें जुनाट होऊन जातील, ह्यासाठीं नव्या लागवडीस आतांच जोमानें आरंभ करावा लागणार आहे.

**'टाइम' साप्ताहिकाच्या छपाईची व्यवस्था**—वरील अमेरिकन साप्ताहिकाच्या पृष्ठांच्या फिल्म्स न्यूयॉर्कमध्यें तयार करण्यांत येऊन त्या प्रत्येक आठवड्यास विमानानें पॅरिस, स्टॉकहोम, रोम, होनोलुलु, मनिला, सिडने व टोकियो येथें धाडण्यांत येतात. येथें त्या फिल्मसचे सहाय्यानें 'टाइम' ची छपाई केली जाते. ह्या व्यवस्थेमुळें हें साप्ताहिक जगांतील कोठेंच्याही देशांत ताजें मिळूं शकतें. कैरो, कलकत्ता, शांघाई, जोहान्सबर्ग, येथेंहि अशीच व्यवस्था लवकरच केली जाईल. ह्या योजनेमुळें "टाइम" च्या प्रसिद्धीचे तारखेचे दिवशींच किंवा तावडतोब त्याचे अंक कोठेंहि मिळूं शकतील.

**असेंब्लीचें अधिवेशन**—मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या अधिवेशनास पुणें येथें ता. १२ जुलै रोजीं प्रारंभ होईल.

**पोस्टल संप**—ऑल इंडिया पोस्टमेन व लोअर ग्रेड स्टाफ युनियननें जाहीर केल्याप्रमाणें संप झाल्यास ५५,३७० पोस्टल कामगार काम बंद ठेवतील.

**पंजाबची मॅट्रिक परीक्षा**—पंजाबमधील मॅट्रिकच्या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांची संख्या ५०,००० वर गेली आहे. विश्वविद्यालयाकडून परीक्षा काढून ती स्वतःकडे घेण्याचा तेथील प्रांतिक सरकारचा विचार आहे.

**नकाशांची विक्री**—खेडेगांवांचे नकाशे लोकांना विकणें बंद ठेवण्यांत आलें होतें, तें मुंबई सरकारानें सुरू केलें आहे.

**सरकारी कचेऱ्यांतील सोई**—तालुका ठिकाणच्या व कलेक्टर आणि प्रांत ह्यांच्या कचेऱ्या येथें कामासाठीं येणाऱ्या लोकांच्या सोईसाठीं ठेवलें, खुर्च्या, बाकें, पिण्याचें पाणी इत्यादि सोई करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

**सक्तीचें प्राथमिक शिक्षण**—सहा ते आठ वर्षें वयाच्या, मुंबई प्रांतांतील १,००० वस्तीपेक्षा मोठ्या खेड्यांतील सर्व मुलांस जून १९४७ पासून शाळांत जाण्याची सक्ती करण्यांत येईल. मुंबई सरकारच्या शैक्षणिक दशवार्षिक योजनेस अशा रीतीनें प्रारंभ होईल.

**डिफेन्स सेव्हिंग्ज बँक खातीं**—पोस्टामध्यें नवीं डिफेन्स सेव्हिंग्ज बँक खातीं उघडण्याचें १ जुलैपासून बंद करण्यांत आलें आहे. सध्यांच्या खात्यांतहि आणखी ठेवी स्वीकारल्या जाणार नाहींत.

**ग्रंथालयांची योजना**—मुंबई येथें एक मध्यवर्ती व पुणें, अहमदाबाद आणि धारवाड येथें प्रादेशिक अशीं ग्रंथालयें स्थापण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

**मशिदीसाठी ४ कोटि रुपये**—वॉशिंग्टन (अमेरिका) येथें ४ कोटि रुपये खर्चून एक मशीद बांधण्याची योजना आंखण्यांत येत आहे. इजिप्तचे राजे, ना. आगाखान व इतर कांहीं मुसलमान ह्यांचेकडून देणग्या येऊन दाखल झाल्या आहेत.

**विश्वकर्मा सहकारी बँक लि.**—वरील बँकेचें उद्‌घाटन खेतवाडी, मुंबई, येथें अर्थमंत्री श्री. मेहता ह्यांनीं रविवार, ता. ३० रोजीं केलें.








पुणें चीफ एजंट्सः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,


















# परदेशस्थ हिंदी नागरिकांची कुचंबणा

ब्रिटिश पंतप्रधान मि. अॅटली यांच्या घोषणेप्रमाणें हिंदी राजकीय पेचप्रसंग सोडवण्याकरितां ब्रिटिश सरकारतर्फे धाडण्यांत आलेल्या शिष्टमंडळाला म्हणावें इतकें यश आलेलें नाहीं. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें हंगामी मध्यवर्ती सरकारांत आपल्या प्रतिनिधींना भाग घेतां येणार नाहीं असें जाहीर केलें. उलटपक्षी मुस्लीम-लीगचे दुराराध्य पुढारी बॅ. जिना यांनीं व्हॉइसराय लॉर्ड वेव्हेल यांच्यावर वचनभंगाचा आरोप केला असून घटना समितीचा पट उधळून लावण्याची तयारी केली आहे. हिंदुस्थानांतील या दोन प्रमुख पक्षांपैकीं कॉंग्रेस हंगामी सरकारांत भाग घेत नाहीं. पण घटना समितीच्या निवडणुकींत भाग घेणार आहे तर मुस्लीम लीग हंगामी सरकारांतहि भाग घेण्यास तयार आहे. पण व्हॉइसरॉय यांनीं सद्यःपरिस्थितींत सरकारी नोकरांचेंच मध्यवर्ती सरकार नेमण्याचें ठरविल्यामुळें तूर्त तरी हिंदी राजकारणाची कांहींच प्रगति झालेली नाहीं असें म्हणावें लागतें.

हिंदी राजकारणाच्या या पार्श्वभूमीवर नजर ठेवूनच परदेशस्थ हिंदी नागरिकांच्या राजकीय व नागरिक हक्कांचा विचार केला पाहिजे. हिंदी मध्यवर्ती सरकार लोक-प्रतिनिधींना जबाबदार नव्हतें तेव्हां दक्षिण अफ्रिकेसारख्या परदेशांतील हिंदी नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली व्हावी हें अपेक्षितच होतें. दिल्ली व सिमला येथें प्रचलित राजकीय अगतिकतेविषयीं वाटाघाटी चालू असतांना सुद्धां हिंदी सरकार परदेशस्थ हिंदी नागरिकांच्या हक्कांच्या रक्षणाबद्दल कांहीं हातपाय हलवेल कीं नाहीं याची शंकाच वाटत होती. पण दिल्लींतील वाटाघाटी यशस्वी होण्यास अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्याच दृष्टीनें बहुधा दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी हायकमिशनर हिंदुस्थाननें परत बोलाविला. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत करून, त्यांच्या अर्थसंपादनाच्या मार्गांत मुद्दाम अडथळे आणून, आणि नागरिक स्वातंत्र्याच्या हक्कावर गदा आणून जनरल स्मट्स यांच्या सरकारनें आपल्या वर्णद्वेषाचें पुनः एक-वार हिडीस प्रदर्शन केलें आहे. यासंबंधीं हिंदुस्थान सरकारनें वेळोवेळीं केलेल्या मतप्रदर्शनाला दक्षिण आफ्रिकन सरकारनें काडीचीही किंमत दिली नाहीं. त्यामुळेंच असेरचा इलाज म्हणून हिंदुस्थान सरकारनें आपला प्रतिनिधि परत बोलावला असून क्रियेला प्रतिक्रिया या न्यायानें आफ्रिकन सरकार व नागरिक ह्यांविरुद्ध आर्थिक दंडयोजनाही अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. युद्ध चालू असतांना हिंदुस्थान सरकार व दक्षिण आफ्रिकेचें सरकार यांच्यांतील परस्पर संबंध जरी सुधारले नाहींत, तरी निदान ते अधिक बिघडले तरी नाहींत. आतां युद्धोत्तर नव्या जगाची घडी बसविण्यांत येत असतां वर्णद्वेषानें प्रेरित होऊन ब्रिटिश 'कॉमनवेल्थ'मधील एका देशानें दुसऱ्या देशाच्या नागरिकांविरुद्ध निंद्य अशा प्रकारचे कायदे पास करावे ही गोष्ट अत्यंत अनुचित असून त्यामुळें वर्णद्वेषाचें भूत गाडलें न जातां अधिक बेफाम मात्र होईल. हिंदुस्थान सरकार दक्षिण आफ्रिकन नागरिकांविरुद्ध प्रत्यक्ष स्वरूपाची आर्थिक दंड योजना अगदींच अल्पप्रमाणांत करू शकतें. परवांच रिझर्व्ह बँकेतर्फे असें जाहीर करण्यांत आलें कीं दक्षिण अफ्रिकेंतील नागरिकांना या बँकेचे भाग बँक कायद्याच्या ४ थ्या कलमाप्रमाणें धारण करतां येणार नाहींत. रिझर्व्ह बँकेच्या भांडवलापैकीं अतिशय थोडें भांडवल दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या नागरिकांकडून आलेलें असलें पाहिजे हें उघडच आहे. अशा तऱ्हेच्या उपायांनीं दक्षिण-अफ्रिकेच्या कांहीं थोड्या नागरिकांचें थोडें-बहुत नुकसान होईल इतकेंच; पण त्यामुळें परदेशस्थ हिंदी नागरिकांच्या राजकीय हक्कांचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटणार नाहीं. याचें कारण शोधण्यास फारसें दूर जाण्याचें कारण नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत वसाहत करून राहिलेल्या हिंदी नागरिकांची लोकसंख्या सुमारें २ लक्ष, ५० हजार इतकी आहे. त्याच्या उलट, हिंदुस्थानांत दक्षिण आफ्रिकेचे नागरिक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतील किंवा नसतील. अशा परिस्थितींत केवळ नागरिक हक्कांच्या दृष्टीनें पाहिलें तर हिंदी नागरिकांच्याच कपाळीं वनवास लिहिलेला आहे हें दिसून येईल.

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदुस्थानचा हायकमिशनर परत बोलाविल्यानेंही दक्षिण आफ्रिकन सरकारचें नुकसान होण्याचा संभव नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी हितसंबंध सुरक्षित रहावे येवढ्याचसाठीं या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत येत असे पण या व्यापारी संबंधांना कायद्यानेंच कातरी लावण्याचें ठरल्यावर हाय कमिशनर तेथें असून नसून सारखाच आहे. दक्षिण आफ्रिका आणि हिंदुस्थान ह्यांत युद्धापूर्वी जो व्यापार चाले त्यांत हिंदुस्थानकडूनच अधिक माल निर्यात होत असे. म्हणजे या व्यापाराचा ताळेबंद हिंदुस्थानला अनुकूल असा होता ही गोष्ट खरी, आणि याच मुद्यावर जोर देऊन असें म्हणण्यांत येतें कीं, हिंदी व्यापाराला उपयुक्त असणारी ही बाजारपेठ हिंदुस्थान सरकारनें आर्थिक दंड योजना स्वीकारली तर आपल्या हातून जाईल. हिंदुस्थान व दक्षिण आफ्रिका यामधील व्यापार पूर्वीसारखाच आजही चालू असता तर वरील आक्षेपाला थोडी बहुत किंमत देतां आली असती. परंतु आज तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. युद्धाच्या सहा वर्षांच्या काळांत या दोन देशांतील व्यापार बऱ्याच प्रमाणांत घटला असून कोणत्याच देशाचें आर्थिक बहिष्कारामुळें फारसें नुकसान होण्यासारखें नाहीं. हिंदी व्यापाराच्या निर्यात बाजारपेठांसंबंधींच बोलावयाचें तर इराण अगर पूर्व अफ्रिका यांतील हिंदी हाय कमिशनरच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालाकडे बोट दाखवितां येईल. वरील दोन देशांतून हिंदी मालाला चांगली बाजारपेठ मिळूं शकेल असा अभिप्राय अहवालांतून व्यक्त करण्यांत आलेला आहे. त्या दृष्टीनें योग्य ते प्रयत्न केल्यास निर्यात बाजारपेठांची अडचण दूर होण्यासारखी आहे. पण बाजारपेठा मिळविण्याची धडपड करण्याची आज हिंदुस्थानला गरजच नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांच्या गरजा आज इतक्या मोठ्या आहेत कीं अजून कित्येक वर्षे त्या भागविण्यासाठीं या देशांतील मालाचा उठाव येथेंच करणें शक्य आहे. या बाबतींत कांहीं तांत्रिक स्वरूपाच्या अडचणी आहेत. परंतु या अडचणींतूनहि मार्ग निघणें कांहीं अशक्य नाहीं. यासंबंधीं एक उदाहरण देतां येण्यासारखें आहे. दक्षिण हिंदुस्थानांत चामडें कमावण्याचा धंदा चालतो. चामडें कमाविण्यासाठीं एक प्रकारच्या झाडाच्या सालींची आवश्यकता असते; हें विशिष्ट प्रकारचें झाड दक्षिण आफ्रिकेंत विपुल असल्यानें तिकडून सालींची आयात हिंदुस्थानांत होत असे. गेलें महायुद्ध सुरू झाल्यावर वहातुकीच्या अभावीं या साली मिळेनाशा झाल्या. त्याबरोबर चामडें कमाविण्याच्या धंद्याबाबत तात्पुरती कां होईना एक आपत्तिच निर्माण झाली. पण त्यामुळें कांहीं धंदा बुडाला नाहीं. हिंदुस्थानच्या जंगलांतील एका झाडाची साल या धंद्यांत उपयोगांत आणिली गेली, आणि अशा तऱ्हेनें आवश्यक अशा एका कच्च्या मालाच्या आयातीशिवाय धंदा बंद पडण्याची जी शक्यता निर्माण झाली होती त्यांतून मार्ग काढण्यांत आला.

दक्षिण अफ्रिकेंतील हिंदी लोकांनीं आतां सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला असून सत्याग्रहींच्या धरपकडीच्या बातम्याही येऊं लागल्या आहेत. त्यामुळें अर्थातच त्या प्रकरणाकडे हिंदी जनतेचें लक्ष अधिक वेधलेलें आहे व राहील. तथापि ब्रह्मदेश, मलाया व सिलोन वगैरे हिंदुस्थान लगत असलेल्या स्वतंत्र देशांतूनही हिंदी लोकांची अशीच पायमल्ली होत आहे. या सर्वच देशांतील हिंदी लोकांच्या प्रश्नाचें स्वरूप अर्थातच एक नाहीं. उदाहरणार्थ, सिलोनमधील बहुसंख्य हिंदी लोक मजूर म्हणून गेलेले आहेत, तर ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांत दक्षिण हिंदुस्थानांतील चेट्टियार सावकार लोकहि आहेत. या सावकार लोकांनीं ब्रह्मी शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तगत केल्यामुळें ब्रह्मदेशांत हिंदी विरोधाची लाट उसळलेली आहे. दक्षिण अफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या हक्काच्या प्रश्नाला जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें गोरा विरुद्ध काळा या स्वरूपाचें आहे. म्हणून त्याला राजकीय रंग प्राप्त होतो. परंतु इतर देशांतील हिंदी नागरिकांचेही प्रश्न तितकेच महत्त्वाचे आहेत हें विसरून चालणार नाहीं. सर रामस्वामी मुदालियार यांनीं केवळ दक्षिण अफ्रिकेंतील प्रश्नच फक्त संयुक्त राष्ट्रसंघटनेंत नोंदविला आहे पण वर्णद्वेश व आर्थिक भेदभाव या दोन्ही कारणामुळें होणारा हिंदी लोकांचा सर्वच छळ संयुक्त राष्ट्र संघटनेपुढें मांडला जाणें आवश्यक आहे.

# स्फुट विचार

## विक्री कराच्या अंमलबजावणीची तयारी

मुंबई सरकारच्या पुनर्घटनेच्या योजना मागेंच जाहीर झाल्या आहेत आणि आणखी योजना पुढें येतीलही. ह्या सर्वांस पैशाचें पाठबळ पाहिजे हें उघड आहे. आवश्यक तो पैसा उभारण्यासाठी मुंबई सरकारनें विक्री-कराच्या अंमलबजावणीस प्रारंभ करण्याचें ठरविलें आहे. एकाच वस्तूवर अनेकवार कर लादला जाऊं नये, निर्गत व्हावयाच्या मालाच्या विक्रीवर कर असूं नये, गरीब जनतेच्या रोजच्या गरजा भागविणारा माल करांतून वगळला जावा, वगैरे गोष्टी सरकारास अर्थातच मान्य आहेत. ९३ कलमा-खालील मुंबई सरकारनें विक्रीकराची योजना तयार करून ठेवली होती. व १ जुलैपासून तो कर अंमलांत येईल असें ठरवून सुमारें ८२½ लक्ष रुपयांचें उत्पन्न अपेक्षिलें होतें. कराची ज्या मालविक्रीस माफी आहे, अशाची यादी तात्काळ वाढवून, कराच्या कायद्यांत महत्त्वाच्या, दुरुस्त्या अनुभवाचे आधारें मागाहून करण्याचें मुंबई सरकारनें आतां निश्चित केलें आहे. हातमागावरील कपास–कापड, कांबळी, लोणी, दही, कांहीं खाद्य तेलें, सर्पण, कोळसा, खतें, पेंड, शेतीचीं अवजारें, शाळांना लाग-णाऱ्या वस्तु व पुस्तकें, इत्यादींस कर द्यावा लागणार नाहीं. व्यापाऱ्यांची छळणूक होणार नाहीं, ह्या दृष्टीनें नियमांत पुष्कळ सुधारणा करण्यांत आल्या आहेत. मुंबई सरकारच्या २८ जूनच्या गॅझिटांत ह्या दुरुस्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. १ ऑक्टोबर पासून मालविक्री करास पात्र होईल व त्यानंतर लायसेनदारांखेरीज इतरानें ज्या मालाचे विक्रीवर कर बसविलेला आहे, अशा मालाची विक्री करणें गुन्हा ठरेल. लायसेन्ससाठी ३१ जुलैपूर्वी अर्ज केले पाहिजेत. नवीन मंत्रिमंडळ अधिकारपदावर आल्याखेरीज विक्री कर बसविण्यांत येऊं नये, असा मुद्दा विरोधकांनीं मागें मांडला होता. आतां ह्या नव्या मंत्रिमंडळानेंच आपल्या योजनांचा खर्च भागविण्यासाठी विक्री कराचा अवलंब केला आहे. तेव्हां, आतां फक्त सुधारणा सुचविण्याचाच प्रश्न शिल्लक रहातो. ह्या सुधारणाहि काय-द्यांत अंतर्भूत व्हावयास बराच अवधि लागेल. जीवनोपयोगी वस्तूंची विक्रीकरांतून सुटका केल्याबद्दल गरीब जनता सरकारचें अभिनंदन करील.

---

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. ची अखंड प्रगति.

वरील कंपनीचा विस्तार आणि भक्कमपणा ह्यांत एकसारखी वाढ होत आहे. १९४५ सालीं १९४४चे पेक्षा १९ लाखांचें काम अधिक झालें, आयुर्निधींत ३०½ लाखांची भर पडून तो २ कोटि, ४० लक्ष रुपयांवर गेला, खर्चाचें आधींच अल्प असलेलें प्रमाण आणखी उतरलें, विमेदारांच्या सोईसाठी नव्या योजना आखण्यांत आल्या, कामाचा प्रसार हिंदुस्थानभर करण्याचें धोरण चालू आहे, वगैरे गोष्टी कंपनीची प्रगतिप्रियता दर्शवि-तात. गुंतवणुकीची नोंदलेली किंमत बाजारभावापेक्षा २८ लाखांनीं कमी आहे. विमा कायद्यांतील दुरुस्त्यांसंबंधीं इतर कंपन्या कांहींहि तक्रार करोत; वेस्टर्न इंडियाला कोणत्याहि दुरुस्तीचा अनिष्ट परिणाम भोगावा लागणार नाहीं हें चेअरमन, डॉ. आगाशे ह्यांचें म्हणणें वस्तुस्थितीस अगदीं धरून आहे. कारण, हीं सर्व बंधनें कंपनीनें केवळ हितप्रद म्हणून ह्यापूर्वीच दीर्घकाळ स्वीकारलीं आहेत आणि त्या बंधनांतच आजचें स्पृहणीय स्थान प्राप्त करून घेतलें आहे. तेव्हां, वेस्टर्न इंडियाची प्रगति अव्याहत चालू राहणार ह्याविषयीं कोणास शंका येण्याचें कारण नाहीं. वेस्टर्न इंडियानें पुरस्कृत केलेल्या युनायटेड वेस्टर्न बँकेचा कारभारहि योग्य प्रकारें चालला आहे. कंपनीच्या विमेदारांना अथवा त्यांच्या वारसांना मिळणाऱ्या विम्याच्या पैशाची व्यवस्था सुरक्षितपणें आणि समाधानकारक रीतीनें करतां यावी म्हणून एक ट्रस्टी आणि एक्झिक्युटर कंपनी काढावी असा संचालकांचा विचार आहे. आयुर्विम्याच्या संरक्षणाबरोबरच विम्याच्या रकमेची सुरक्षितता आणि तिची लाभकारक गुंतवण करितां यावी या दृष्टीनें या कंपनीचा उपयोग होणार आहे. विम्याच्या रकमा किंवा इतर कोणत्याही खाजगी अगर सार्वजनिक ट्रस्टबद्दलची व्यवस्था अशी नवी कंपनी करूं शकेल. अशी कंपनी अवश्य तर युनायटेड वेस्टर्न बँक आणि सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी यांच्या साहाय्यानें सुरू करण्याचा विचार आहे.

---

## कामाचे तास कमी झाले; मजुरी उतरेल काय ?

फॅक्टरी कायद्यांत दुरुस्ती करणारा कायदा १ ऑगस्ट, १९४६ पासून अंमलांत येणार आहे. ह्या कायद्यानें कामगारांचे कामाचे तास कमी केलेले आहेत. कमी तास काम झालें तरी पूर्वीं प्रमाणेंच कामगारांना मजुरी द्यावयाची काय, असा प्रश्न आतां उपस्थित झाला आहे. मजुरी कमी केली नाहीं, तर कारखानदारांस ती आतां परवडणार नाहीं व मजुरी कमी केली तर कामगार असंतुष्ट होणार, अशी बिकट परिस्थिति निर्माण होणार, असें दिसतें. कामाचे तास कमी केले तरी कामाचा उठाव पूर्वी-प्रमाणेंच झाला तर हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. परंतु, तसें घड-ण्याचा संभव नाहीं. कामगारांच्या सुखसोई वाढविल्या तर त्याचा परिणाम कार्यक्षमता वाढण्यांत होतो असा पाश्चात्य देशांतील अनुभव हिंदुस्थानांत लागलींच लागू पडल, असें दिसत नाहीं. त्या कारणानें, कामाचे तास कमी झाले कीं उत्पादनहि घटणार, हें ठरल्यासारखेंच आहे. विशेषतः कामगारांची सध्यांची प्रवृत्ति ह्या घटनेस पोषक अशीच आहे. अशा परि-स्थितींत, उत्पादन खर्च शक्य तो न वाढवितां कामगारांस संतुष्ट कसें राखावें, असा बिकट प्रश्न सर्वच कारखानदारांपुढें उभा राहिला आहे. युद्धकाळांत कारखानदारांनीं चांगला नफा मिळविला असल्याकारणानें, त्यांचेकडून कांहींहि सवलती घेण्याचा आपला हक्कच आहे परंतु किमान काम देण्याची जबाबदारी मात्र आपणांवर नाहीं, अशी वृत्ति कामगारांची झाली असल्याकारणानें कारखानदारांनीं समतोलपणानें ह्या गोष्टीकडे पहाणें आवश्यक झालें आहे. युद्धकालीन तेजी संपण्याच्या अखेरचे काळांत, त्यांस हा प्रश्न सोडवावा लागत आहे.

---

## नव्या शेअर्सची विक्री—भागीदारांची हायकोर्टांत तक्रार

बाँबे लाइफ अॅ. कं. लि. च्या दोन भागीदारांनीं, कंपनीची ३८ वी वार्षिक साधारण सभा २८ जून रोजीं भरविण्यास प्रतिबंध करण्यांत यावा अशी मुंबई हायकोर्टाकडे मागणी केली. २१ फेब्रुवारी १९४६ रोजीं कंप-नीच्या डायरेक्टरांनीं शेअर होल्डरांकडे एक सर्क्युलर पाठवून कंपनीचें भांड-वल वाढविल्याचें कळविलें आणि प्रत्येक १०० रुपयांचा शेअर ७५ रुपये वाढाव्यानें देऊं केला. त्यांत प्रस्तुत अर्जाचा उगम आहे. जुलै, १९४६ मध्यें कंपनीची वार्षिक सभा होते तिचे पूर्वी मार्च १९४६मध्यें द्याव्याची तारीख ठरविण्यांत यावी, असें वरील भागीदारांचें म्हणणें होतें त्याप्रमाणें हायकोर्टानें १ जुलै ही तारीख निश्चित केली होती. कंपनीची वार्षिक सभा दरसाल जुलैमध्यें भरते, परंतु यंदा ती डायरेक्टरांनीं मुद्दाम २८ जून रोजीं बोलाविली अशी अर्जदार भागीदारांनीं हायकोर्टाकडे तक्रार केली, तिला उत्तर देतांना " नवे शेअर्स हायकोर्टानें कायदेशीर ठरवीपर्यंत त्यांवर डिव्हिडंड व बोनस वाटण्यांत येणार नाहीं" असें कंपनीनें आश्वासन दिल्यावरून सभा भरविण्यास प्रतिबंध करण्या-संबंधीं हायकोर्टानें कांहींहि हुकूम केला नाहीं.

---

## मॅनेजिंग एजन्सीची विक्री

मधुसूदन मिल्स लि. ची व्यवस्था आतांपर्यंत मेसर्स अमरसी दामोदर ह्यांचेकडे होती. त्यांनीं आपले मॅनेजिंग एजन्सीच्या मालकीचे सर्व शेअर्स (१६,०००) १ कोटि, ४४ हजार रुपयांस लाला गुरुशरण लाल ह्यांस विकले आहेत. मधुसूदन मिल्सच्या शेअरचा बाजारभाव ६३८ रुपये आहे. वरील व्यवहारांत तो ९०० रुपये पडला. कानपूर कलकत्ता वगैरे ठिकाणचे धनिक मुंबईच्या उद्योगधंद्यांत अधिकाधिक लक्ष्य घालूं लागले आहेत, त्या प्रवृत्तीस धरूनच हा व्यवहार झाला आहे आणि त्यासाठी बाजारभावा-पेक्षा सुमारे ४२ लक्ष रुपये ज्यास्त द्यावे लागले आहेत.

---

## शेवडे बंधूंचें फोटोग्राफीच्या सामानाचे उत्पादनांतील प्रावीण्य

### ( दि शेवडेज् कॅमेरा वर्क्स लि., बेळगांव )

१९२५ सालापासून श्री. दत्तोपंत शेवडे यांनीं केवळ स्वतःच्या अंगमेहनतीच्या व बुद्धिकौशल्याच्या भांडवलावर अत्यंत सुबक व टिकाऊ असे कॅमेरें व इतर सामान तयार करण्यास सुरवात केली. स्टुडिओ व हातकॅमेरे, स्लाईडस्, स्टुडिओ स्टँडस्, स्टुडिओ औटफिटस्, ट्रिपोडस्, मेटल स्टँडस्, प्रिंटिंग फ्रेम्स, ड्रॉईंग रॅक्स, ट्रिमिंग बोस्, री-टचिंग डेस्कस्, निगेटिव्ह स्टोअरेज बॉक्सेस्, लेदर केसिस, लेदर व आर्टिफिशीअल बेलोज, एन्लार्जर्स वगैरे वस्तू कौशल्यपूर्णपणें तयार करण्यांत शेवडे-बंधूंचा या वेळेपासूनच हातखंडा होता. परंतु मागणीच्या प्रमाणांत पुरवठा करण्याइतकी कारखान्याची उत्पादनशक्ति योग्य भांडवलाचे अभावीं अस्तित्वांत नसल्यामुळें कारखान्याची उभारणी १९३४ सालीं लिमिटेड कंपनीच्या स्वरूपांत करण्यांत आली. परंतु आश्वासित मदत आयत्यावेळीं न मिळाल्यामुळें, शेवडे बंधूंना पुष्कळसें नियोजित कार्य अर्धवट सोडून बरेंचसें आर्थिक नुकसानही सोसावें लागलें व त्यामुळेंच मध्यंतरीं शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. ही संस्था अस्तित्वांत आहे किंवा नाहीं, असेंही लोकांना वाटूं लागलें होतें.

कॅमेरे व त्यांना लागणारें सर्व प्रकारचें सामान यावरोबरच, याच सुमारास "स्प्रिंगटाईप" ( हातानें चालविण्याचें ) डुप्लीकेटर्स त्यांनीं तयार केले. हे डुप्लीकेटर्स इतके सुबक व कार्यक्षम होऊं लागले कीं त्यांचा खप मोठमोठ्या डीलर्सकडून होऊं लागला.

१९४३ सालच्या अखेरीस शेवडे बंधूंनीं भारतीय छाया लेखन शास्त्रांत सर्वांत मोठा विक्रम करून दाखविला. हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा खात्याकडून शेवडे बंधूकडे निजाम सरकारच्या करन्सी खात्याला लागणाऱ्या नोटा छापण्याचा स्टेप अॅण्ड रिपीट इक्विपमेंटबद्दल चवकशी केली गेली. अखिल हिंदुस्थानांत नोटा छापण्याकरितां, ऑफसेट प्रिंटिंग इक्विपमेंटला लागणारें वरील यंत्र कोणीही तयार करूं शकत नव्हतें व हें इक्विपमेंट हिंदुस्थानांत तयार होईल असें सरकारी किंवा अन्य कोणाही व्यक्तींच्या ध्यानींमनींही नव्हतें. परंतु श्री. व्ही. बी. शेवडे यांनीं आपल्या कुशाग्र बुद्धीनें वरील इक्विपमेंटचीं स्केचेस तयार करून, हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पसंत करून घेऊन या इक्विपमेंटची आर्डर मिळविली व पुरी केली.

१९२२ सालापासून जुजबी आणि अत्यंत अल्प सामुग्रीवर सुरवात केलेल्या कारखान्यांतून वरील प्रकारचे विसाव्या शतकांतील कोणाही पाश्चात्य निर्मित ऑफ-सेट-प्रिंटिंग इक्विपमेंट इतकेंच कार्यक्षम असें छायालेखन यंत्र तयार करण्याचा विक्रम शेवडे बंधूंनीं केला आहे.

### हात व पॉवर मागाचीं शटलस व बॉबिन्स

श्री. व्ही. बी. शेवडे यांनीं मध्यंतरींच्या काळांत हातमागाचीं शटल्स तयार करण्याचे बाबतींत संशोधन करून व त्याकरितां डेहराडून वगैरे ठिकाणीं जाऊन वरील प्रकारच्या मालास लागणाऱ्या लाकडांची तपासणी वगैरे केली व इतरही थोडेसे प्रयोग करून गेल्या वर्षीपासून दक्षिण हिंदुस्थानांतील प्रत्येक हातमागाच्या केंद्रावर आपल्या कारखान्याचे शटल्स विकले जाण्याची व्यवस्था करून टाकली. याबरोबरच टेक्स्टाईल मिल्सना लागणाऱ्या सर्व प्रकारच्या बॉबीन्स, शटल्स, लांकडी रोलर्स वगैरे सामानही या कारखान्यांत पुढील २-३ महिन्यांत तयार करण्याची त्यांनीं व्यवस्था केली आहे.

" शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. " या कंपनीच्या १९४५ सालअखेरच्या ताळेबंदांत निवेदन केल्याप्रमाणें सध्यां बेळगांव नजीक रेल्वेलाईनजवळ घेतलेल्या नवीन जागेंत कारखाना नेला जात असून थोड्याच दिवसांत पूर्वीपेक्षां दुप्पट उत्साहानें तेथें काम करण्यास सुरवात होणार आहे. कंपनीला १९३५ पासून ते १९३९ साल अखेर मोठ्या प्रमाणावर तोटा सोसावा लागला. १९३९ सालानंतर कंपनीनें प्रशंसनीय प्रगति केली आहे. १९४० सालीं कंपनीस ९१ रु. नफा झाला. १९४५ सालीं तो ५३१४ रुपयांवर गेला आहे.

शेअर-विक्रीबरोबरच ठेवी घेण्यासही कंपनीच्या संचालक मंडळानें सुरवात केली आहे.

हिंदुस्थानांत फोटोग्राफिक गुडस तयार करणारे कारखाने हातावर मोजण्याइतकेच म्हणजे दोन तीनच आहेत. त्यांत " शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. " या कारखान्याचा नंबर सर्वांत वरचा लागेल यांत संशय नाहीं. (मा. पत्रक:)

### रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण

२१—६—४६

| | |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | रु. |
| अ. सोनें व सोन्याचीं नाणीं:- | |
| हिंदुस्थानांतील सांठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील सांठा | ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,३५,३२,८९,००० |
| अची बेरीज | ११७९,७४,३४,००० |
| ब. रुपयाचीं नाणीं | १६,४१,६७,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,०५,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी ( चलनी नोटांची एकूण रक्कम ) | १२,५४,००,०६,००० |

यशाची ग्वाही देणारे हे आंकडेच तुमची खात्री पटविल्याशिवाय रहाणार नाहींत

★ पूर्ण झालेलें काम (१९४५) रु. १६,६९,०००
★ कंपनीची एकूण मालमत्ता रु. २ लाखांचे वर
★ वार्षिक उत्पन्न (१९४५) रु. १ लाख ३१ हजारांचे वर
★ लाइफ फंड रु. १ लाख ४३ हजारांचे वर
★ खर्चाचें प्रमाण (रिन्युअलवर) रु. १४·७%

दि सुप्रीम म्यूच्युअल अशुअरन्स कंपनी लि.,
८६६ सदाशिव पेठ, पुणें शहर

## इरिगेशन खात्याचें धोरण

### स्थानिक शेतकरी बागाइतदारांस प्राधान्य देण्याबद्दल मागणी

डेक्कन कॅनॉल्स बागाइतदार परिषदेनें बेलापूर रोड येथें नेमलेल्या शिष्टमंडळानें ता. २५-६-४६ रोजीं इरिगेशन खात्याचे मंत्री श्री. गिल्डर यांची पुणें येथें त्यांचे ऑफिसांत भेट घेतली. शिष्टमंडळाचे नेते अर्थशास्त्रज्ञ प्रो. धनंजयराव गाडगीळ यांनीं श्री. गिल्डर यांचेपुढें शेतकऱ्यांचे वतीनें खालीलप्रमाणें आपलें म्हणणें सविस्तरपणें मांडलें.

(१) इतःपर, शेती हा ज्यांचा धंदा नाहीं अशा बाहेरच्या भांडवलदारांस कॅनॉलवर साखर कारखाने काढणेस परवानगी न देतां ती स्थानिक शेतकरी बागाईतदारांना सहकारी तत्त्वावर त्यांनीं मागणी केल्याप्रमाणें देण्यांत यावी. (२) ३५–६५ टक्के पाण्याचें प्रमाण काटेकोरपणें पाळलें जात नाहीं तें पाळण्यांत यावें. (३) फॅक्टरी एरियामधील खुद्द खातेदारांना फॅक्टरी एरियाबाहेर न घालवितां त्यांचे बारमाही व आठमाही ब्लॉक्स आहेत तेथेंच कायम ठेवण्यांत यावेत व ब्लॉक्स हालविण्याबद्दल बागाईतदारांना दिलेल्या नोटिसा तातडीनें परत घेण्यांत याव्यात. (४) ओव्हर लॅपिंगला पाणी देणें बंद केलें आहे तें देण्यांत यावें. (५) एक्स लिमिटस् वाढवून मिळाव्यात. (६) घासाला कॅनॉलचें पाणी ताबडतोब देण्यांत यावें. (७) चराचें पाणी शेतकऱ्यांना मिळावें (८) चराच्या पाण्याचे केलेले पंचनामे रद्द व्हावेत. (९) सरकारी लिफ्टचें पाणी शेतकऱ्यांनाच देण्यांत यावें. (१०) वाढविलेली पाणीपट्टी रद्द करण्यांत यावी. (११) उपळलेल्या जमिनींत सरकारनें लौकर चर काढावेत. (१२) संडरोल्याच्या मुदती संपलेल्या जमिनी ऊस लावणेसाठीं मूळ मालकास परत याव्यात. (१३) साखर कारखान्यांना वाढवून दिलेलें पाणी कायमचें कमी करण्यांत यावें व कमी केलेलें पाणी पुन्हा परत देऊं नये वगैरे.

### इरिगेशन मंत्र्यांचा खुलासा

यावर नामदार गिल्डर यांनीं सांगितलें कीं, यापुढें लहान लहान शेतकऱ्यांच्या हिताकडे जरूर तें लक्ष पुरविलें जाईल कोणाही व्यक्तिगत भांडवलदारास साखर कारखाने काढण्यास परवानगी दिली जाणार नाहीं. देणें झाल्यास शेअर होल्डर शेतकऱ्यांना सहकारी तत्त्वावरच साखर कारखाने काढण्यास परवानगी देण्यांत येईल. कॅनालपासून निव्वळ उत्पन्न वाढवावें असें या सरकारचें धोरण असेल असें नाहीं परंतु पाण्याचा लहान लहान शेतकऱ्यांना जास्तींत जास्त उपयोग कसा होईल व त्यांची परिस्थिति कशी सुधारेल इकडेच प्रामुख्यानें लक्ष दिलें जाईल. संघटितरित्या सहकारी तत्त्वावर शेती करणारांना सरकार विशेष सहाय्य करील. फॅक्टरी एरियांतील ब्लॉकचे बाबतींत तातडीनें विचार करण्याचें आश्वासन त्यांनीं दिलें आहे. ३५:६५चें प्रमाण ४१:५९वर आले आहे. तें कमी कसें करावें, नवीन साखर कारखान्यांस दिलेल्या परवानग्या व जुन्या कारखान्यांना वाढवून दिलेलें पाणी रद्द करण्याबद्दल सरकार विचार करीत आहे. याशिवाय इतर मागण्याबद्दलही सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें त्यांनीं आश्वासन दिलें आहे.

सदर शिष्टमंडळांत मंडळाचे नेते प्रो. धनंजयराव गाडगीळ, आमदार श्री. रामभाऊ गिरमे, आमदार श्री. डी. ए. देशमुख, मुं. प्रॉ. को. बँकेचे श्री. धारप व श्री. तांबवेकर व प्रत्येक कॅनालवरील बागाईतदार असे एकूण २५ लोक हजर होते.


# विम्याची विश्वासभूमि

विमा उतरण्याचें मनांत येतांच मनुष्य निर्भयपणें

## वेस्टर्न इंडियाची

निवड करतो. याचीं कारणें अनेक आहेत. चोख कर्तव्यदक्ष कारभार, भक्कम आर्थिक सुस्थिति, विमेदारांच्या सुखसोयींची काळजी, नाना प्रकारच्या विमायोजना, यांचें सातत्य कंपनीनें गेलीं बत्तीस वर्षें स्थिर ठेविलें आहे. बत्तिसाव्या वर्षाचें इतिवृत्त मागवून एकवार वाचून पाहा, म्हणजे विमा उतरण्यास तशी एजन्सी घेण्यास हीच कंपनी कशी सर्वथैव पात्र आहे ही गोष्ट मनास तत्काल पटेल.

# वेस्टर्न इंडिया

## आयुर्विमा कंपनी लि. सातारा.

पुणें शाखा:–१७९ बुधवार, लक्ष्मी रस्ता, पुणें २

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा

सिंप्लेक्स रु. ९ दि. ४-७-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २५।६।४६ | बुधवार २६।६।४६ | गुरुवार २७।६।४६ | शुक्रवार २८।६।४६ | सोमवार १।७।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स् | ३० | ३२४५-० | ३२१८-१२ | ३२२०-० | ३१९६-४ | —बाजार बंद— |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५७१-० | ५६६-० | ५६६-० | ५६२-० | |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २६१५-० | २६११-४ | २६४१-४ | २६२२-८ | |
| ७०२; ५६६ | १९-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९५७-९ | ९४३-० | ९४८-० | ९४४-० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८५४-० | ८४७-० | ८४९-० | ८४१-० | |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४७१-० | ४७१-० | ४७३-८ | ४७०-८ | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४६७-० | ४६२-० | ४६६-० | ४६२-० | |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३९५-० | ३९२-० | ३९४-० | ३९१-० | |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४४८-४ | ४५१-८ | ४५९-० | ४५५-० | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५-७-६ | ५-६-६ | ५-७-६ | ५-६-६ | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२-३-६ | २१-१५-६ | २२-०-६ | २१-१५-० | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स् | १ | ४-७ | ४-७-६ | ४-८-९ | ४-९-० | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९९८-१२ | ९८५-० | ९८०-० | ९७५-० | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २६०-८ | २६०-० | २६१-० | २५९-१२ | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३३८-० | ३३६-८ | ३३९-० | ३३६-० | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ८०२-८ | ७८५-० | ८०२-८ | ७९०-० | |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ६०-४ | ६०-१० | ६०-२ | ५९-२ | |
| | | | ३½% गोल्ड | १०० | १०४-१३ | १०४-११ | १०४-१५ | १०५-३ | |

**बनावट नोटा**—बंगालमध्यें बनावट पांच रुपयेवाल्या नोटांचा प्रसार झाला आहे, त्यासंबंधांत बंगाल सरकारनें जनतेस सावधगिरीची सूचना दिली आहे.

**चहाच्या मळ्यांचे शेअर्स**—हिंदी भांडवलवाले चहाच्या मळ्यांत अधिकाधिक पैसा गुंतवूं लागले आहेत. मळ्यांच्या खऱ्या किंमतीच्या दुपटी इतके पैसे देऊन ते लहान लहान मळे खरेदी करीत आहेत. त्याचप्रमाणें, चहाच्या ब्रिटिश कंपन्यांचे शेअर्स लंडनमध्यें खरेदी करण्यास त्यांनीं प्रारंभ केला आहे. दहा शेअर्स वर्ग करण्यांत आले, त्यांपैकीं सात हिंदी लोकांच्या हातांत गेले, असें एका कंपनीच्या बाबत घडल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ही प्रवृत्ति अशीच वाढल्यास, हिंदुस्थानांतील चहाच्या मळ्यांची मालकी हळूहळू हिंदी लोकांकडे जाईल अशी भीति ब्रिटिश कंपन्यांना वाटूं लागली आहे. हिंदी लोकांचे नांवें शेअर्स वर्ग होणें कठीण करण्याचे दृष्टीनें चहाच्या कंपन्यांची आर्टिकल्स बदलण्याचा त्या कंपन्यांचे डायरेक्टर विचार करीत आहेत.

**गुमास्ता कायद्यांत सुधारणा**—गुमास्ता कायद्यांत आवश्यक त्या सुधारणा सुचविण्याची कामगिरी मुंबई सरकारनें भारत सेवक समाजाचे श्री. रघुनाथराव बखले, एम. एल. सी. ह्यांचेकडे सोंपविली आहे.

**न मागणी केलेल्या व्याजाचा मुस्लिम ट्रस्ट**—मुसलमान धर्माच्या विशिष्ट तत्त्वानुसार मुसलमान लोक व त्यांचे ट्रस्ट पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक खातीं व सरकारी प्रामिसरी नोटा ह्यांवरील ज्या व्याजाची मागणी करीत नाहींत, असें १९२७ पासूनचें व्याज मुसलमान जमातीस परत देण्यांत यावें अशी मागणी मि. अहमद जाफर ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत केली होती. मुसलमानांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीं ह्या व्याजाचा उपयोग करतां येईल, असा त्या मागणीचा हेतु होता. ही मागणी सरकारनें मान्य केली आहे. फंडाचा विनियोग करण्यासाठीं, मध्यवर्ती असेंब्लीच्या मुसलमान सभासदांचा एक ट्रस्ट करण्यांत येईल.







## कांच-महर्षि श्री. चांदोरकर ह्यांचा सन्मान

रविवार, ता. १६ जून रोजीं मुंबई येथें वागळे हॉलमध्यें पैसाफंड कांच कारखान्याचे पूर्वीचे चालक व हल्लीचे विजय ग्लास वर्क्स (माझगांव) चे मालक श्री. रा. दा. चांदोरकर ह्यांचा श्री. पु. बा. गोळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगीं श्री. शं. वि. सोहोनी, श्री. नगीनदास मास्टर, परशुराम पॉटरीचे मालक श्री. गणपुले, श्री. रजबअली, श्री. काकासाहेब तांबे, श्री. नानासाहेब पुराणिक, श्री. का. भा. लिमये, इत्यादींचीं भाषणें झालीं.

श्री. दादासाहेब गोळे हे आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, "चांदोरकरांच्या संशोधनाचा विशेष म्हणजे परदेशाकडे तोंड फिरवून आयत्या मिळणाऱ्या ज्ञानाकडे आशाळभूतपणें न पहातां त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक स्वतः स्वतंत्र संशोधन करून परकीयांनाही अचंबा वाटावा अशा तऱ्हेचा माल हिंदुस्थानांत करून दाखविला. महाराष्ट्रीय वृत्तींतील सर्व गुण चांदोरकरांमध्यें प्रकर्षानें असल्यामुळें श्री. चांदोरकर हे महाराष्ट्रीय संशोधकाचे एक आदर्श प्रतिक आहेत. औद्योगिक क्षेत्रांतील श्री. चांदोरकर यांची यशःसिद्धि ही मात्र महाराष्ट्रीयांमध्यें सहसा 'न आढळणाऱ्या औद्योगिक सहकार्य, चिकाटी, धंद्यांतील सचोटी या गुणांमुळेंच आहे. विशेष गोष्ट म्हणजे या सर्वांचा त्यांनीं केवळ स्वार्थाकरितां उपयोग न करितां आपल्या वयाचीं पहिलीं बहुमोल पंचवीस वर्षें पैसाफंड कारखान्यांत घालविलीं. पैसाफंड कांच शाळा ही हिंदुस्थानांतील आजच्या औद्योगिक प्रगतीची जननी आहे असा यथार्थानें उल्लेख करतां येईल; इतक्या योग्यतेचीं माणसें तळेगांवीं तयार करवून औद्योगिक क्षेत्रास त्यांनीं पुरविलीं. देशाच्या उन्नतीस राजकीय प्रगतीइतकीच जर औद्योगिक प्रगतीचीही जरूर असेल तर श्री. चांदोरकर यांच्या ह्या कामगिरीबद्दल त्यांचा उल्लेख महान् देशभक्त म्हणून करावा लागेल."

सत्कारास उत्तर देतांना श्री. चांदोरकर म्हणाले, "एकेकट्यानें संशोधन करून पुष्कळ वेळ खर्च करण्यापेक्षां सरकारनें आजची औद्योगीकरणाची आवश्यकता जाणून देशामध्यें एक सुसज्ज प्रयोगशाळा स्थापन करावी. त्याबाबत योग्य ती मदत देण्यास आपण तयार आहों. आपण मिळविलेल्या ज्ञानाचा व संशोधन करून मिळविलेल्या निष्कर्षांचा फायदा देशाच्या औद्योगिक उन्नतीकरितां करण्यांत आपणास आनंद वाटेल. माझेवर आलेल्या संकटांतून बाहेर पडण्यास माझ्या पाठीमागें खंबीरपणानें उभे राहिलेले माझे सहकारी मला लाभले नसते तर मी कोठें राहिलों असतों हें मला सांगतां येत नाहीं. त्यांच्या माझ्यावर असलेल्या अढळ निष्ठेमुळेंच मला थोडेंफार काम करितां आलें." आपलें उर्वरित आयुष्य याच कामीं खर्चण्याचें आश्वासन देऊन त्यांनीं आपलें भाषण संपविलें. कांच-महर्षि चांदोरकर हे त्यास समर्पण करण्यांत आलेल्या थैलीचा उपयोग आपल्या सहकाऱ्यांच्या सल्ल्यानें करणार असल्याचें त्यांनीं जाहीर केलें.


## कपास कापडाचा ग्रेट ब्रिटनमधील धंदा

एकुण चात्यांपैकी १८.५% चात्या व मागांपैकी २२.५% माग हे सूत काढणें व कापड विणणें हे दोन्ही धंदे करणाऱ्या फर्म्सच्या मालकींत आहेत. सूत काढणाऱ्या गिरण्या मोठ्या आहेत. सर्व गिरण्यांत मिळून ३ कोटि, ८५ लक्ष चात्या आहेत. एकुण १,००० फर्म्सच्या मालकीचे ५००,००० माग आहेत. कापडाच्या प्रत्येक गिरणींत सरासरीनें २०० पेक्षां अधिक कामगार नाहींत.

१९२४ सालीं स्पिनिंग व वीव्हिंगमध्यें मिळून ५,२८,००० कामगार होते; जुलै, १९४५ मध्यें त्यांची संख्या फक्त २,०९,००० होती. १९३७ मधील उत्पादनाइतकें उत्पादन चालू ठेवावयाचें असल्यास किमान ३,९०,००० कामगार पाहिजेत, परंतु २,५०,००० पेक्षा अधिक कामगार उपलब्ध होण्याचा संभव नाहीं.

सन १९०० पूर्वीं बांधलेल्या इमारतींतच स्पिनिंगकडील ६१% व वीव्हिंगकडील ६९% यंत्रें आहेत, ह्यावरून पुराणपणाची कल्पना येईल. मागांपैकीं ५% सुद्धा माग ऑटोमॅटिक नाहींत.

विनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

महाराष्ट्र शारदेची तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
पैसा व ज्ञान मिळवा !
श्रीमंत कसें व्हावें—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा। किं. १॥ रु.
१०० टक्के यश—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील। किं. १॥ रु.
काम आणि कामिनी—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
मृत्युलोकचा प्रवास—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल। किं. १ रु.—चारीं पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ।
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.